दाखल तारीख : २२.०१.२०१४

नोंदणी तारीख : २२.०१.२०१४

निर्णय दिनांक : ०५.०४.२०१७

कालावधी : वर्ष महिना दिवस
०३. ०२. १३

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कल्याण, ४ थे न्यायालय यांचे न्यायालयात,**
**ता. कल्याण. जि. ठाणे.**
(श्रीमती. एस्. एस्. पारखी)

***नियमित फौजदारी केस क. ८१/२०१४***

**निशाणी क.** १६

**महाराष्ट्र पोल्युशन कंट्रोल बोर्ड,**
३रा व ४था मजला, कल्पतरू पॉईट बिल्डींग,
सायन पूर्व, मुंबई —४०० ०२२.
तर्फे — श्री.बी.पी.साळुंखे,
विभागीय अधिकारी, कल्याण,
महाराष्ट्र पोल्युशन कंट्रोल बोर्ड,
ऑफीस पत्ता — सिध्दीविनायक संकुल,
३रा व ४था मजला, ओक बागजवळ, ...फिर्यादी
कल्याण प., जि.ठाणे.

**विरुध्द**

१. **मे.पद्मश्री बिल्डर,**
२०१, क्रिष्णा कॉम्प्लेक्स,
सागर इंट. हॉटेलजवळ, वलीपीर रोड,
कल्याण पश्चिम, जि.ठाणे.

२. **कानसिंग राजपुरोहीत,**
मालक मे.पद्मश्री बिल्डर,

२०१, क्रिष्णा कॉम्प्लेक्स,
सागर इंट. हॉटेलजवळ, वलीपीर रोड,
कल्याण पश्चिम, जि.ठाणे.　　　　　　　.... आरोपी.

<u>**दोषारोप**</u> :— पर्यावरण (संरक्षण) कायदा, १९८६ चे कलम १५ व १६ अन्वये दोषारोप.

फिर्यादी पक्षातर्फे वकील श्रीमती रूपाली अ.शेठ.
<u>आरोपीतर्फे वकील श्री.के.टी.जैन.</u>

## :न्यायनिर्णय:

(निकाल घोषित दि.०५/०४/२०१७)

१. प्रस्तुतची केस आरोपी क्र. १ व २ विरुध्द पर्यावरण (संरक्षण) कायदा, १९८६ चे कलम १५ व १६ अन्वये दाखल करण्यात आली.

२. फिर्यादी पक्षाची हकीकत पुढीलप्रमाणे :—

यातील फिर्यादी हे लोकसेवक असुन आरोपी क्र.१ ही खाजगी कंपनी आहे व आरोपी क्र.२ हे त्याचे मालक आहेत. आरोपींनी पर्यावरण संरक्षण कायदयाअंतर्गत कार्यक्षम पदाधिका—यांकडुन पर्यावरण अनुमती प्रमाणपत्र (Environment clearance) न घेता निवासी व औद्योगिक बांधकाम २०००० चौ.मिटरपेक्षा जास्त बांधकाम सुरू केले, या संदर्भात आरोपींना दि. १६/०५/२०१३ रोजीची नोटीस देण्यात आली. त्याबाबत आरोपीला दि. २६/११/२०१३ रोजी वैयक्तीक चौकशीसाठी बोलवण्यात आले आणि त्यांना पर्यावरण अनुमती घेईपर्यंत बांधकाम थांबवण्याचे आदेश देण्यात आले. याप्रकारे आरोपीने पर्यावरण (संरक्षण) कायदा, १९८६ चे कलम १५ व १६ व इन्वॉरमेंट इम्पॅक्ट असेसमेंट नोटीफिकेशन, २००६ प्रमाणे खटला दाखल करणेत आला.



३. सदर केसमध्ये आरोपींनी नि.१२ येथे अर्ज देवून त्यांना गुन्हा कबूल असल्याचे कथन केले. तसेच आरोपी क्र. १ चे मालक म्हणून आरोपी

चे मालक म्हणून यांना फौजदारी प्रक्रियां संहिता कलम २४१ प्रमाणे पर्यावरण (संरक्षण) कायदा, १९८६ चे कलम १५ व १६ या गुन्हयासाठी रक्कम रू.१,००,०००/– चा दंड, दंड न भरल्यास १ महिना साधी कैदेची शिक्षा ठोठावण्यात येते.

२. सदर निकालाची विनामुल्य प्रत आरोपीला देण्यात यावी.

कल्याण.
दिनांक :०५/०४/२०१७

(श्रीमती एस्. एस. पारखी)
४ थे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
कल्याण.

Fine paid Rs 1,00,000/-
(Rs One Lakh only) on
5/4/17

SENIOR CLERK
J.M.F.C. Court, Kalyan
05/04/17

Received copy of order free of cost
5/4/17

सत्य-प्रत
(सौ. एम.एम. देशपांडे)
सहाय्यक अधिक्षक
पहिले न्यायालय, कल्याण-

छायांकित व
मजकूर करणार :-

26 APR 2017

26 APR 2017

64